ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक

सामना

मुंबई, शुक्रवार २९ ऑगस्ट २००८

# लठ्ठपणावर 'वोक्हार्ट'ची मात



अंधेरी, दि. २८ – आता अतिलठ्ठ माणसांचे वजनही एका शस्त्रक्रियेने क्षणापैकी आटोक्यात येऊ शकते. 'वोक्हार्ट' या आंतरराष्ट्रीय रुग्णालयाचे शल्यचिकित्सक डॉ. रमेन गोयल यांनी हे शक्य करून दाखवले. यामुळे पथ्य करणाऱ्यांना बरीच सुटका मिळणार आहे.

सुलेमान विरानी या व्यक्तीचे वजन तब्बल २६७ किलो इतके होते. परिणामी सुलेमानला त्याच्या अवाढव्य शरीराची हालचाल करता येणेही अशक्य होऊन बसले. गेली पाच वर्षे तो घरातून बाहेर पडलाच नाही. अखेर त्याच्या नातलगांनी त्याला शस्त्रक्रियेचा पर्याय सुचवला. सुलेमानला वोक्हार्ट रुग्णालयात दाखल केल्यानंतर उपचारादरम्यान त्याचे १२ किलो वजन घटले. डॉ. गोयल यांनी सुलेमानवर १८ ऑगस्ट २००८ रोजी (Laparoscopic Sleeve Gastrectomy) दीड तास बॅरियॅट्रिक शस्त्रक्रिया केली. त्यामुळे सुलेमानचे थोडेथोडके नव्हे तर १०० किलोपेक्षा जास्त वजन कमी झाले. हे आश्चर्यकारक असले तरी ती वस्तुस्थिती आहे. या शस्त्रक्रियेमुळे शरीरातली अनावश्यक हानीकारक चरबी तर कमी करता येतेच, पण त्याचबरोबर टाईप २ डायबेटीस संपूर्णपणे बरा करता येऊ शकतो.